• सेन्सॉरने निर्दयपणे कैची चालवल्यामुळे सलगता हरवलेला *मौसी* • कधीही पडद्यावर न आलेला फिल्मीस्तानचा *जासूस* • मीनाकुमारी, दिसी नवलप्रमाणे निरुपा रॉयला शायरीचा छंद होता. *सम्राट चंद्रगुप्त*मध्ये तिला ती संधी मिळाली.

□ इसाक मुजावर

**मौसी(१९५८):**

*दो फूल*बरोबरच १९५८ साली पडद्यावर आलेला वसंत देसाई यांचा *मौसी* हा शांतारामबापूंच्या राजकमलचा एक चित्रपट. आणि तो *तुफान और दिया*चे दिग्दर्शन करणारे शांतारामबापूंचे पुत्र प्रभातकुमार यांनीच दिग्दर्शित केला होता. पण *तुफान और दिया*चे यश काही या चित्रपटाला लाभले नाही. सेन्सॉरने निर्दयपणे कात्री चालवल्यामुळे हा चित्रपट आपली सलगताच हरवून बसला. या चित्रपटाचे संगीतकार वसंत देसाई पाश्चिमात्य संगीताचा सतत विरोध करणारे तसेच आपल्या चित्रपटातून भारतीय संगीताचा पुरस्कार करणारे. तरीही या चित्रपटात त्यांनी 'हे बम्बो, बम्बोलोरे, बुढे बच्चे झूठे सच्चे' हे रॉक एन रोल संगीतातील गाणे दिले होते. पण ते रॉक एन रोल संगीताच्या प्रेमामुळे मात्र नव्हे. 'मिस्टर जॉन बाबाखान', 'इना मिना डिका' या गाण्याद्वारा भारतीय चित्रपट संगीतात येऊ पाहत असलेल्या रॉक एन रोल संगीताच्या लाटेला त्यांचा तीव्र विरोध होता. या संगीताला ते आपल्या चित्रपट संगीतात येऊ पाहत असलेले प्रदूषण मानायचे. या प्रदूषणाचा निषेध करण्यासाठी 'बम्बो, बम्बोलोरे' हे रॉक एन रोल गाणे *मौसी*त त्यांनी दिले होते आणि या गाण्यात रॉक एन रोल संगीतावर त्यांनी भरपूर तोंडसुखदेखील घेतले होते. पण रॉक एन रोल संगीताचा वाद तेव्हा असा जोरात होता की, या गाण्यातील रॉक एन रोल संगीतावरील तोंडसुख प्रेक्षकांनी एका कानाने एकून दुसऱ्या कानाने सोडून दिले आणि 'मिस्टर जॉन बाबाखान', 'इना मिना डिका' या गाण्याप्रमाणेच या रॉक एन रोल गाण्यालादेखील डोक्यावर घेतले.


'मिस्टर जॉन बाबाखान' व 'इना मिना डिका' गाणाऱ्या आशाबाईंनीच *मौसी*तील विडंबनात्मक रॉक एन रोल गाणे गायले होते. आणि ते या चित्रपटाद्वारा पडद्यावर येत असलेल्या अभिनेत्री वंदनावर चित्रित करण्यात आले होते. ही वंदना म्हणजे नंतरच्या काळातील मराठी व हिंदी चित्रपटातील एक अभिनेत्री आशा नाडकर्णी. रॉक एन रोल गाण्याबरोबरच आशाबाईंनी या चित्रपटातील 'क्या हो गया, क्या हो गया आसमान धरती पर टूटा' हे आणखी एक गाणे एकटीने गायले होते. तर 'जा री जा बाई, मैं देश बिदाई' हे गाणे कोरसबरोबर. 'मेरी गोदी मे गोपाला मन मे मगन हो' हे या चित्रपटातील एक गाणे लताबाईंच्या आवाजात होते आणि 'टिम टिम टिम तारो के दीप जले, नीले आकाश तले' हे गाणे त्यांनी तलतबरोबर गायले होते. हे द्वंद्वगीतच या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते. 'जिसके सरसे उठ जाए, बिन मैया का लाल' हे एक गाणे मन्ना डेच्या आवाजात होते. 'नही बेटा रहा बाप का' हे आणखी एक गाणे या चित्रपटात होते. या चित्रपटाची सारी गाणी भरत व्यासनी लिहिली होती.

**जासूस(१९५८):**

*मौसी*बरोबरच सेन्सॉरच्या कात्रीत अडकलेला १९५८च्या आसपासचा आणखी एक चित्रपट म्हणजे फिल्मीस्तानचा *जासूस*. *मौसी* बरीच काटछाट होऊन पडद्यावर आला. पण *जासूस* कधीच पडद्यावर आला नाही. यामुळे हा चित्रपट आज कोणाला आठवण्याचे काहीच कारण नाही. तरीही अनेकांना हा चित्रपट आजही आठवतो तो या चित्रपटातील तलतच्या एका गाण्यासाठी. हे गाणे म्हणजे 'जीवन हे मधुबन, तू इसमें फूल खिला'.

*जासूस*चे संगीतकार होते अनिल विश्वास. १९५८च्या आसपास रेडिओ सिलोनवरील फर्माईश कार्यक्रमात हे गाणे सतत वाजायचे. यामुळेच या गाण्याला लोकप्रियता मिळाली आणि *जासूस* प्रेक्षकांपर्यंत पोचला नाही तरी या गाण्याच्या लोकप्रियतेत काहीच फरक पडला नाही. हा


वसंत देसाई


अनिल विश्वास

चित्रपट पडद्यावर आलेला नसल्यामुळे हे गाणे या चित्रपटात पडद्यावर कोणावर चित्रित केले गेले असेल हे सांगता येणार नाही. पण सत्तरच्या दशकात आपल्या चित्रपटात प्रामुख्याने चरित्र अभिनेत्याच्या भूमिकेत दिसणारा अभिनेता अभि भट्टाचार्य *जासूस*चा नायक होता. यामुळे हे गाणे त्याच्यावरच चित्रित केले गेले असावे, असा अंदाज आहे. तलतने गायलेले 'जीवन है मधुबन' हे एकच गाणे *जासूस*मध्ये होते आणि ते इंदिवरनी लिहिले होते.

या चित्रपटात एकूण नऊ गाणी होती आणि यापैकी 'ही, ही, हा, हा, हा' व 'छूमत अंगारे है' ही दोन गाणी गीता दत्तने गायली होती. दोन्ही गाणी क्लब संगीताच्या वातावरणातील होती. 'है दिल के काले', 'दुनिया है मिठी कटारी', 'तुम काहेको नैना लगाए' व 'हाय बरजोरी' ही या चित्रपटातील चार गाणी आशा भोसलेंनी एकटीने गायली होती आणि 'मतलबी यार किसके खाया पिया और खिस केन', 'सुनो सुनो ऐ दुनियावालो पाकेटमार की अजब कहानी' ही दोन गाणी आशा भोसले व मन्ना डे यांनी गायली. यापैकी 'पाकेटमार की अजब कहानी' हे गाणे एक पैरोडी

गाणे होते आणि ते मजरूहनी लिहिले होते.

### *सम्राट चंद्रगुप्त*(१९५८):

हुस्नलाल-भगतराम यांची जोडी आपल्या चित्रपट संगीतातील संगीतकारांची पहिली जोडी. त्यानंतरची दुसरी जोडी शंकर-जयकिशन यांची. आणि तिसरी जोडी कल्याणजी-आनंदजी यांची. पण या जोडीचा उदय काही आपल्या चित्रपट संगीतात जोडीच्या रूपात झाला नव्हता. या जोडीतील कल्याणजींनी संगीतकार म्हणून एकट्यानेच आपली वाटचाल सुरू केली होती. कल्याणजी वीरजी शाह या नावाने १९५८चा *सम्राट चंद्रगुप्त* त्यांनी संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. आनंदजी या चित्रपटात त्यांचे सहाय्यक होते. गुजरात-कच्छ येथील कुरोडी हे कल्याणजींचे जन्मगाव. त्यांचे वडील वीरजी शहा यांचा घरचा व्यापार होता. आणि आपल्या मुलांनी कल्याणजी-आनंदजी व बाबला यांनी तो वाढवावा


कल्याणजी

अशी त्यांची इच्छा होती. पण त्या तिघांचा लहानपणा-पासूनच संगीताकडे ओढा होता. कल्याण-जीभाई बासरी वाजवायला शिकले होते आणि त्यांच्या बासरीवादनावर खूश होऊन पृथ्वीराज कपूरनी लहान वयातच त्यांना शाबासकी दिली होती. या शाबासकीमुळे त्यांचे संगीतप्रेम वाढीला लागले. त्यांच्या घरच्या लोकांना ही गोष्ट पसंत नव्हती. यामुळे सुरुवातीला घरच्या मंडळींच्याकडून त्यांना विरोध झाला. पण या विरोधाची पर्वा न करता आपली संगीत साधना त्यांनी चालूच ठेवली. बाजाच्या पेटीसारखे दिसणारे क्लेव्हायोलिन नामक एक विदेशी वाद्य आहे. ते आणून कल्याणजींनी त्या वाद्यावर आपली संगीत साधना सुरू केली. या वाद्याचं वैशिष्ट्य हे आहे की, या वाद्यातून कोणत्याही वाद्यांचा सूर छेडता येतो. या वाद्यांच्या या कौशल्यामुळे कल्याणजींचा चित्रपट संगीतात प्रवेश झाला १९५४च्या फिल्मीस्तानच्या *नागिन* या चित्रपटाच्यावेळी. *नागिन*चे संगीतकार होते हेमंतकुमार. *नागिन* गारूड्यांच्या जीवनाच्या पार्श्वभूमीवरील एक चित्रपट असल्यामुळे या चित्रपटाच्या संगीतात हेमंतकुमारना पुंगीच्या बीनचा सूर हवा होता. खऱ्याखुऱ्या पुंगीच्या सुरात एक कर्कशता आहे. यामुळे त्यांना हवा असलेला पुंगीचा सूर काही केल्या खऱ्याखुऱ्या पुंगीतून त्यांना मिळायला तयार नव्हता. नेमकी याचवेळी कल्याणजींशी त्यांची भेट झाली आणि त्यांनी त्यांना हवा असलेला पुंगीचा सूर क्लेव्हायोलिन या आपल्या वाद्यातून त्यांना काढून दाखवला. तो हेमंतकुमारना एकदम आवडल्यामुळे *नागिन*मधील पुंगीच्या सुरासाठी त्यांनी कल्याणजींच्या क्लेव्हायोलिनचा उपयोग केला. कल्याणजींचे क्लेव्हायोलिन वादन *नागिन*च्या संगीताचे सर्वात मोठे आकर्षण ठरले आणि त्यानंतर निरनिराळ्या गावातून क्लेव्हायोलिन वादनाच्या कार्यक्रमासाठी त्यांना बोलावणे येऊ लागले. भारतभर क्लेव्हायोलिन वादनाचे कार्यक्रम करीत ते फिरले. एका बाजूला हे कार्यक्रम करीत असताना दुसऱ्या बाजूला तेव्हा ते हेमंतकुमार यांच्याबरोबर सहाय्यक म्हणून काम करीत होते. या कामातून त्यांना चित्रपट संगीताचा अनुभव मिळत गेला. दिग्दर्शक मनमोहन देसाई यांचे बंधू सुभाष देसाई १९५८ साली चित्रपट निर्माते बनले. *नागिन*पासून सुरू झालेली कल्याणजींची चित्रपट संगीतातील वाटचाल ते अगदी डोळसपणे पाहात होते. यामुळे त्यांनी आपल्या *सम्राट चंद्रगुप्त* या पहिल्याच चित्रपटात त्यांना संगीत दिग्दर्शनाची संधी दिली. कल्याणजींनी कल्याणजी वीरजी शाह या नावाने या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन केले. आनंदजी तेव्हा त्यांचे सहाय्यक होते.

*सम्राट चंद्रगुप्त*ची गाणी भरत व्यास, इंदीवर व हसरत यांनी लिहिली होती. पण या चित्रपटातील 'मुझे देख चांद शरमाए' हे गाणे या तिघांपैकी कोणी लिहिलेले नव्हते. तर चित्रपटाची नायिका निरूपा रॉय हिने लिहिले होते. अनेकांचा यावर विश्वास बसणार नाही. कारण मीनाकुमारी, दिप्ती नवल या अभिनेत्रींच्या काव्यप्रेमाप्रमाणे निरूपा रॉयच्या काव्यप्रेमाची कधीच चर्चा झालेली नाही. मीनाकुमारीची शायरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली आहे. खय्यामनी तिची शायरी तिलाच गायला लावून तिच्या शायरीची ध्वनिमुद्रिकादेखील काढली आहे. दिप्ती नवलचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. निरूपा रॉयची शायरी मात्र कधीच प्रकाशात आलेली नाही. पण मीनाकुमारी व दिप्ती नवल यांच्याप्रमाणे तिलादेखील शायरीचा छंद आहे. तिचा हा छंद पाहूनच सुभाष देसाईंनी *सम्राट चंद्रगुप्त*मधील 'मुझे देख चांद शरमाए' हे गाणे लिहायची संधी तिला दिली. तिचे हे गाणे कल्याणजी वीरजी शाह यांच्या संगीतात लताबाईंनी गायले होते. निरूपा रॉयवर चित्रित करण्यात आलेलं ते गाणं लोकप्रिय ठरले होते.

निरूपा रॉयने लिहिलेले एक गाणे एकटीने गात असताना लताबाईंनी इंदीवर यांची दोन गाणी या चित्रपटात गायली होती. या गाण्यांपैकी 'कल, कल, छल, छल, बहती जाऊं मस्त नदी' हे गाणे लताबाईंनी एकटीने गायले होते. तर 'रंगीले मोरे राजा' हे गाणे कोरसबरोबर. हसरतनी या चित्रपटातील 'ऐ दिलवर आजा' व 'ये समां है मेरा दिल जवां' ही दोन गाणी लिहिली होती. या गाण्यांपैकी 'ऐ दिलवर आजा' हे गाणे लताबाईंनी कोरसबरोबर गायले होते, तर 'ये समा है मस्त' हे गाणे मन्ना डेबरोबर 'चाहे पास हो चाहे दूर हो' व 'जा तोसे नहीं बोलू घुंघट नही खोलूं' ही या चित्रपटातील गाणी भरत व्यासनी लिहिली होती आणि ती लता व रफी यांनी गायली होती.

*सम्राट चंद्रगुप्त*ची भूमिका या चित्रपटात भारत भूषणने केली होती. त्यांची बैजूची प्रतिमा तेव्हा पुसली गेली नव्हती. यामुळेच की काय कोण जाणे त्याला चंद्रगुप्त बनवताना तो एक योद्धा होता, याचा विसर या चित्रपटाचे दिग्दर्शक बाबूभाई मिस्त्री यांना पडला होता आणि त्याला 'चाहे पास हो चाहे दूर हो' सारखी विरह गीते रडक्या चेहऱ्याने गायला लावून चंद्रगुप्तचा या चित्रपटात त्यांनी एकदम बैजू करून टाकला होता. रणांगणावर लढण्याऐवजी नायिकेबरोबर गाणी गाणारा चंद्रगुप्तच या चित्रपटात अधिक वेळ पडद्यावर दिसत होता. हा गाणारा चंद्रगुप्त तेव्हा हास्याचा विषय झाला होता. या चित्रपटाला संगीत देताना कल्याणजी वीरजी शाहनी काळाचे भान ठेवले नव्हते. यामुळे हा चित्रपट मौर्यकालीन असला तरी या चित्रपटाचे संगीत मात्र पन्नासच्या दशकातील संगीतासारखेच वाटत होते. या चित्रपटातील संगीतातील हा सर्वात मोठा दोष होता. हा दोष नजरेआड करून विचार करायचा झाला तर मात्र या चित्रपटातील संगीतात लोकप्रियता मिळविण्याची क्षमता होती. यामुळेच या चित्रपटाने कल्याणजी वीरजी शाह यांची चित्रपट संगीतातील वाटचाल एकदम सुकर करून टाकली. ●